



UNITE FOR GOOD

# अजिंठा

ऑगस्ट- २०२५ ● अंक-२ रा




आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेइझो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी


Rotary | UNITE FOR GOOD

ROTARY CLUB JALGAON

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26

Estd. 6th February 1950


## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

ऑगस्ट महिन्याचा हा 'अजिंठा' चा अंक सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. या अंकात जुलै महिन्यातील आपल्या झालेल्या साप्ताहिक सभा, आपले प्रोजेक्टस् इतर नेहमीची सदरे, आणि दि. २० जुलै रोजी झालेला नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा या सगळ्या गोष्टींचा वृत्तांत आपणास देत आहोत. पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने आपण अजिंठाचा इंग्लिश मध्ये खास विशेषांक काढला होता. त्याचेही आपण सहर्ष स्वागत केले. त्याबद्दल खूप खूप धन्यवाद!

खरंच, आपला जैन हिल्सच्या रम्य परिसरात आयोजित केलेला पदग्रहण सोहळा हा एक यशस्वी कार्यक्रम म्हणून गणला जाईल आणि त्याचे सर्व श्रेय आपल्या 'टीमवर्क' ला आहे, असे आपले यावर्षीचे अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी हे अगदी प्रामाणिकपणे नमूद करतात असे म्हणतात. Talent wins games, but Teamwork and Intelligence win Championships या उक्तीप्रमाणे आपल्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली आपण एकत्र येऊन UNITE FOR GOOD या वर्षीच्या संदेशाप्रमाणे उत्साहाने कार्यरत राहून पुढील अनेक उपक्रम यशस्वी करूया. मेंबरशिप आणि न्यू क्लब डेव्हलपमेंट या ऑगस्ट डेसिग्नेटेड मंथ मधील विषयावर लक्ष केंद्रीत करूया. या अंकातील उगवते तारे, डेसिग्नेटेड मंथ, मेंबरशिप आणि न्यू क्लब डेव्हलपमेंट, बॉलीवूड टाईम्स् ही नेहमीची सदरे आपणास आवडतीलच. आपल्या प्रतिक्रिया नक्की कळवा.

धन्यवाद !

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो,

जुलै महिन्यात आपल्या क्लबने प्रेरणादायी सुरुवात केली. पदग्रहण सोहळ्यात पीआरआयपी कल्याण बॅनर्जी, डीजी नाना शेवाळे आणि अशोकभाऊ जैन यांची उपस्थिती हा अभिमानाचा क्षण ठरला. आर.आय.पी.ई प्रोजेक्ट सुरू झाला, निधी उभारणीसाठी रोटरी जळगाव आयकॉन बुक, संकल्प चांगला माणूस बनण्याचा या चारित्र्य निर्माणावर आधारित पुस्तिकेची निर्मिती, गरजू विद्यार्थ्यांना सुमारे २५०० वह्यांचे वाटप, ७x७x७ अंतर्गत व्याख्याने, व. वा. जिल्हा वाचनालय यांच्यासोबतचा रोटरी वाचन कट्टा यासारखे उपक्रम सुरु झाले. 'मुलांना फुलू देऊ या' या विषयावरील कार्यशाळा योजण्यात आली.

ऑगस्ट महिन्यात, सर्वोत्कृष्ट फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शन, तसेच वृत्तपत्र छायाचित्रकारांचा सन्मान, एक दिवसीय सहल, प्रा. प्रकाश पाठक यांचे देशसेवेवरील जाहीर व्याख्यान, पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आदी कार्यक्रम नियोजित आहे.

आपला यावर्षी २ आरसीसी, २ रोटाकिडस् व २ रोटरॅक्ट क्लब स्थापन करण्याचा संकल्प आहे. ऑगस्ट हा Membership and New Club Development Month असल्याने Each One Bring One संकल्पात सहभागी होऊया.

आपण सर्वांनी मिळून नियोजनाची अंमलबजावणी करत क्लबची सेवा आणि फेलोशिप अधिक बळकट करू या!

सेवेत आनंद, रोटरीत अभिमान!

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

## जुलै महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ दि. ४ जुलै २०२५ –** रोजी सौ.स्मिता पाटील वळसंगकर यांनी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे माता आणि बालकांवर होणारे परिणाम या विषयी खूप अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. स्क्रीन टाईम च्या आहारी गेल्याने किती नुकसान होते हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन पटवून दिले. याप्रसंगी रो.स्वाती ढाके यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि रो.पंकज व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी अनेक रोटरी सदस्य व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.




**✻ दि.१३ जुलै २०२५ –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत क्लब असेंब्ली आयोजित करण्यात आली होती. क्लबच्या सर्व कमिटीच्या चेअरपर्सन यांनी आपापल्या कमिटीचा अहवाल सादर केला. याप्रसंगी असिस्टंट गव्हर्नर रो.डॉ.अपर्णा भट या सुद्धा उपस्थित होत्या. त्यांचे स्वागत अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी केले.



**✻ दि.२० जुलै २०२५ –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत नवीन नूतन अध्यक्ष आणि सचिव यांचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. आय.पी.पी. ॲड.सागर चित्रे यांनी नूतन अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांना कॉलर प्रदान केली. या विशेष सभेची माहिती पान नंबर ३ वर सविस्तर दिलेली आहे.




**✻ दि.२५ जुलै २०२५ –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत क्लबचे बजेट रो.उदय पोतदार यांनी सादर केले तर ट्रस्टचे बजेट माजी अध्यक्ष रो.प्रेम कोगटा यांनी सादर केले. याही सभेस उपस्थिती चांगली होती.

# साप्ताहिक सभा

## विशेष साप्ताहिक सभा....
## देणगीपेक्षा गरजूंच्या जीवनातील आनंद महत्त्वाचा
– पी.आर.आय.पी. कल्याण बॅनर्जी

## गांधीतीर्थ येथे रोटरी क्लब जळगावचे पदग्रहण उत्साहात

जळगाव – सामाजिक कार्यासाठी किती देणगी किंवा आर्थिक निधी दिला यापेक्षा गरजू व्यक्तींच्या जीवनात किती आनंद निर्माण झाला हे महत्त्वाचे आहे असे रोटरीचे माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष कल्याण बॅनर्जी यांनी प्रतिपादन केले. जैन हिल्स, गांधी तीर्थ येथील कस्तुरबा सभागृहात झालेल्या रोटरी क्लब जळगावच्या ७६ व्या पदग्रहण सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे, जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडचे चेअरमन अशोक जैन, सहप्रांतपाल डॉ.अपर्णा भट – कासार यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना बॅनर्जी यांनी कलकत्ता येथे देशातील रोटरीचा पहिला क्लब स्थापन झाला असून आजची रोटरी सदस्यांची संख्या पाहता सर्वात वेगाने वाढणारी ही स्वयंसेवी संस्था आहे असे सांगून सेवाकार्य करताना संख्यात्मक नव्हे तर गुणात्मक दर्जा गरजेचा आहे असे ते म्हणाले. मराठी भाषा, संस्कृती याविषयी आपुलकी व्यक्त करत त्यांनी आपल्या भाषणाला मराठीतून सुरुवात करून उपस्थितांची मने जिंकली. प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी हे रोटरी वर्ष परिवर्तनाचे असून रोटरी सेवेसाठी आहे असे सांगितले. अशोक जैन यांनी गिरीश कुलकर्णी यांच्यासारखा सामान्य कार्यकर्ता आज रोटरीचा अध्यक्ष होऊ शकतो याबद्दल आनंद व्यक्त करून रोटरॅक्ट या रोटरीच्या युवा संघटनेत केलेल्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत रोटरी क्लब जळगावने मानद सदस्यत्व दिल्याबद्दल मनोगतात आभार व्यक्त केले. मावळते अध्यक्ष ॲड.सागर चित्रे यांनी गिरीश कुलकर्णी यांना अध्यक्षपदाची सूत्रे दिली तर पराग अग्रवाल यांनी सुभाष अमळनेरकर व पंकज व्यवहारे यांना सचिवपदाची सूत्रे दिली. ॲड. सागर चित्रे यांनी कार्यअहवाल सादर करून सूत्रसंचालन केले. अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करून कार्यकारणीची घोषणा केली. त्यांच्या मातोश्री सुनंदा कुलकर्णी यांनी यावेळी भावना व्यक्त केल्या. प्रारंभी मृण्मयी कुलकर्णी हिने कथक नृत्यद्वारे गणेशवंदना सादर केली. यावेळी अजिंठा या क्लब बुलेटीनच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. परिचय डॉ.प्रदीप जोशी व डॉ.अपर्णा भट – कासार यांनी करून दिला. आभार ॲड. हेमंत भंगाळे यांनी मानले. कार्यक्रमात जितेंद्र ढाके यांनी रोटरी फाउंडेशनच्या कार्यासाठी तीन लाख रुपयांचा तर क्लबतर्फे करण्यात येणाऱ्या मोतीबिंदूंच्या मोफत शस्त्रक्रियांसाठी कवरलाल संघवी यांनी एक लाख रुपयांचा आणि विजय जोशी यांनी पंचवीस हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. पदग्रहण सोहळ्यास माजी प्रांतपाल डॉ. चंद्रशेखर सिकची, राजीव शर्मा, राजेंद्र भामरे, डॉ.आरती व डॉ. संजीव हुजूरबाजार, इनरव्हीलच्या माजी डिस्ट्रिक्ट चेअरमन संगीता घोडगावकर, सुदर्शन अय्यंगार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.











# प्रोजेक्ट

# जुलै महिन्यातील प्रोजेक्ट



✻ **दि. ५ जुलै २०२५ –** आपल्या वर्कशॉप कमिटी तर्फे 'मुलांना फुलू देऊया' हे पहिले वर्कशॉप घेण्यात आले. शहरातील एकूण २७ पालक व शिक्षक या कार्यशाळेला उपस्थित होते. सुप्रसिद्ध प्रशिक्षक सौ.स्मिता पाटील वळसंगकर यांनी अनेक छोट्या छोट्या कृतीतून उत्तम पालकत्वाच्या टिप्स दिल्यात. क्लबचे अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.



✻ **दि. ७ व ८ जुलै २०२५ –** पुणे येथील समुपदेशक सौ.प्रणाली महाशब्दे यांनी रोटरीच्या राईप (आर.आय.पी.ई.– Rotary's Ignition Programme in Edcucation) या महत्त्वाच्या प्रोजेक्ट मध्ये भाग घेणाऱ्या ११ शिक्षिकांना प्रशिक्षण दिले.



✻ **दि. ५ जुलै २०२५ –** रोजी आपल्या क्लबच्या १५ शाळांतील १५ इंटररॅक्ट क्लबचा पदग्रहण सोहळा क्लबच्या सभागृहात संपन्न झाला. प्रमुख पाहुण्या सौ.स्मिता पाटील वळसंगकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व डिस्ट्रिक्ट इंटरॅक्ट कमिटी चेअरमन पीपी रो.मनोज जोशी, क्लबच्या इंटरॅक्ट कमिटी चेअरमन रो.काजल फिरके व अनेक सदस्य यावेळी उपस्थित होते.




✻ **दि. ८ जुलै २०२५ –** आपल्या क्लब तर्फे पहिली पिंक ऑटो रिक्षा (महिलांसाठी असलेली) ही सौ.योगिता संदीप पाटील यांना मा.जिल्हाधिकारी श्री.आयुष प्रसाद यांच्या हस्ते, पी.डी.जी. रो.डॉ.सिकची, रो.ॲड.सागर चित्रे, रो.पराग अग्रवाल, रो.जितेंद्र ढाके यांच्या प्रमुख उपस्थितीत भेट देण्यात आली.




✻ **दि. ११ जुलै २०२५ –** रोजी गुरूपौर्णिमा दिनी रोटरी क्लब जळगावने महत्त्वाकांक्षी प्रकल्प राइपची (RIPE) ११ शाळांमध्ये सुरूवात केली. हा ६ वी च्या ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या प्रगल्भ करणारा प्रोजेक्ट आहे. विविध शाळांमध्ये उपस्थित राहून रो.गिरीश कुलकर्णी, रो.सुभाष अमळनेकर, रो.स्वाती ढाके यांनी मार्गदर्शन केले. या प्रकल्पाच्या समन्वयक समुपदेशक सौ.वसुधा शिगवण या असून रो.डॉ.शुभदा कुलकर्णी या प्रकल्प प्रमुख आहेत.

# प्रोजेक्ट

# जुलै महिन्यातील प्रोजेक्ट

*** दि.११ ते ३० जुलै २०२५ –** ७x७x७ हा ऑनगोईंग प्रोजेक्ट या महिन्यात खालील शाळांमध्ये राबविण्यात आला. शाळांची नावे– १) का.ऊ.कोल्हे विद्यालय, २) नंदिनीबाई मुलींचे विद्यालय, ३) पी.के.गुळवे विद्यालय, ४) जिजामाता विद्यालय, ५) संत हरदासराम विद्यालय, ६) आदर्श सिंधी विद्यालय, ७) बाहेती विद्यालय, ८) भगीरथ हायस्कूल, ९) या.दे.पाटील विद्यालय, १०) शारदा विद्यालय, ११) ए.टी.झांबरे विद्यालय, १२) अभिनव माध्य.विद्यालय, १३) श्रीराम माध्य.विद्यालय, १४) शकुंतला विद्यालय





*** दि. २६ व ३० जुलै २०२५ –** दि. २६ जुलै रोजी अभिनव विद्यालयात विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याचप्रमाणे ३० जुलै २०२५ रोजी इंटरॅक्टच्या १४ शाळांमध्ये गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. यात ५० डझन वह्या भवरलाल आणि कांताबाई जैन फाऊंडेशन यांनी दिल्या आहेत. नॉन मेडीकल कमिटी चेअरमन रो.संदीप शर्मा, अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी व इतर अनेक रोटेरीयन सदस्य उपस्थित होते.

*** दि. १३ व २७ जुलै २०२५ रोटरी वाचन कट्टा –**



* दि. १३ जुलै



* दि. २७ जुलै

दि. १३ जुलै रोजी रोटरी वाचन कट्ट्याची सुरूवात व.वा.वाचनालयात करण्यात आली. याप्रसंगी कु.अश्विनी उमाळे, कु.अनघा व्यवहारे, प्रदीप रस्से, रोटरी क्लबचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप जोशी व कार्याध्यक्ष अनिल शहा यांची व्यासीपठावर उपस्थिती होती.

दि.२७ जुलै रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जुन्या जळगावातील वाड्यामध्ये रोटरी वाचन कट्ट्याचे दुसऱ्या पुष्पाचे आयोजन करण्यात आले होते. यात सुप्रसिद्ध कवयित्री व साहित्यिक प्रा.संध्या महाजन यांनी बहिणाबाईंच्या कवितांचे वाचन केले व त्याबद्दल विस्तृत माहिती दिली. त्यांचे मनोगतात त्यांनी प्रतिपादन केले,..... ''बहिणाबाईंच्या कवितांचा माझ्या जडण घडणीत मोठा वाटा असून त्यामुळेच मला आज माझ्या समूहात बहिणाबाईंची लेक म्हणून ओळखले जाते. बहिणाबाईंची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. महाविद्यालयात दुसऱ्या वर्षात मला पहिल्यांदा बहिणाबाईंची कविता अभ्यासाला मिळाली. आणि मी त्यांची झाले. त्यांनी आपल्या बोलीतून मराठी भाषेला अधिक समृद्ध केले.''

बहिणाबाई चौधरी मेमोरीयलचे समन्वयक अशोक चौधरी यांनी ट्रस्ट आणि संग्रहालयाविषयी, बहिणाबाईंच्या प्रकाशित साहित्याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमास रोटरी क्लब अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, कार्याध्यक्ष अनिल शहा, स्मिता चौधरी, साहेबराव पाटील, डॉ.वैभव सरोदे, डॉ.गौरी सरोदे, रो.संदीप शर्मा, रो.किशोर जाखेटिया, रो.स्वाती ढाके, रो.राकेश चव्हाण, रो.कमलेश चांदवाणी, रो.उल्हास सुतार, रो.बिपीन काबरा, रो.गणेश झंवर, देवेश चौधरी, लिशा चौधरी तसेच अकोला येथील रो.डॉ.जुगल चिरानिया यांसह अनेक वाचन प्रेमी उपस्थित होते.

## उगवते तारे

# आकाशी झेप घे रे पाखरा

रो.स्वाती ढाके



मुलांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे आपण सर्वत्र ऐकतो, पण त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. ती पालकांनाही आणि मुलांनाही. तोयस आणि वृषांक लहानपणापासूनच अभ्यासाव्यतिरिक्त विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी प्राविण्य मिळवलेले. दोघेही जण कराटेचे ब्लॅक बेल्ट आहेत, तोयस पियानो वाजवतो तर वृषांक व्हायोलिन. तोयसने जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्येही बक्षीस मिळवलेले आहे. लहानपणापासून शालेय जीवनापर्यंत वेशभूषा स्पर्धा म्हटल्यावर तोयस आणि वृषांक यांच्याशिवाय दुसरे कोणाला पहिलं बक्षीस मिळायचंच नाही ,तसेच स्पर्धा परीक्षा जसे स्कॉलरशिप, एम टी एस, एन टी एस यातही त्यांनी यश संपादन केलेले आहे. पशुपक्ष्यांविषयी दोघांनाही अत्यंत जिव्हाळा आहे. तोयस हा न्यूयॉर्कमधील पक्षी संवर्धन संस्थेशी जोडला गेलेला आहे ,तर वृषांकचे असं स्वप्न आहे की ,त्याच्या घरामध्ये त्याला सर्व प्रकारचे प्राणी पाळायचे आहेत .अगदी हत्ती घोड्यापासून कुत्री मांजर पर्यंत!

मुलं लहान असताना आम्ही २२ पालकांनी मिळून एक ग्रुप तयार केला होता. त्यात आम्ही मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त विविध क्षेत्रांची माहिती करून दिली आणि आज आमच्या ग्रुप मधील सर्व मुलं हे विविध क्षेत्रांमध्ये अतिशय उत्तम कामगिरी करत आहेत. याचंच एक उदाहरण म्हणजे मागील अंकात आपण रो. राजेश यावलकर यांची कन्या आश्लेषा आणि सुपुत्र पुष्कर याच्याबद्दल वाचले. हे आमच्याच पेरेंटिंग ग्रुप मधले !


लहानपणापासून तोयस ने पायलट व्हायचं स्वप्न पाहिले होते .पुढे सायबर ओलंपियाड मध्ये दरवर्षी गोल्ड मेडल मिळाल्याने त्याच्या कम्प्युटर मधला इंटरेस्ट वाढला आणि त्यांने कम्प्युटर क्षेत्र निवडले. बी ई कम्प्युटर झाल्यावर तो अमेरिकेतील मेरी लँड या युनिव्हर्सिटीतून एम एस झाला .आज जॉब करत आहे आणि लहानपणापासून काहीतरी नवीन करायची सवय असल्याने त्याने त्याचे लहानपणीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी परीक्षा दिल्या आणि प्रायव्हेट पायलटच लायसन मिळवले. तीन तास पूर्ण त्याने आम्हाला विमानातून न्यूयॉर्क शहर दाखवले. तोयस च्या वेगळेपणाबद्दल सांगायचं तर लंडनला गेल्यावर बकिंगहॅमपॅलेस न बघता , त्याने आवर्जून भेट दिली ते फादर ऑफ कॉम्प्युटर चार्लस् बॅबेज यांच्या थडग्याला आणि अलॅन टुरिंग यांच्या घराला .कंप्यूटर मध्ये करिअर करणाऱ्यांसाठी ह्या दोन अतिशय महत्त्वाची व्यक्ती आहेत.

धाकटे चिरंजीव वृषांक हुशार पण अत्यंत संवेदनशील फोटोग्राफीची खूप आवड असल्यामुळे कोरोना काळात त्यांने फोटोग्राफीचे खूप सारे कोर्सेस केले. आणि बक्षीसही मिळवली आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मधून एम टेक केमिकल करून तो सध्या युनिव्हर्सिटी ऑफ वॉशिंग्टन मध्ये एम एस मटेरियल सायन्स करत आहे .योगाची त्याला आवड असल्यामुळे योगशिक्षक ही तो झालेला आहे. आज अमेरिकेतील युनिव्हर्सिटी मध्ये योग शिक्षक म्हणून तो पार्ट टाइम जॉब करत आहे. मुलांच्या या प्रवासात त्यांची हुशारी ,अपार कष्ट, स्मार्टवर्क याचा फार महत्त्वाचा वाटा आहे. मोबाईल, टी व्ही ,गेमिंग या व्यतिरिक्तही एक वेगळं सुंदर जग आहे आणि ज्यात आपण खूप काही करू शकतो हे या दोघांनीही दाखवून दिले. पालक म्हणून आम्हा दोघांनाही त्यांचा खूप अभिमान वाटतो.

रोटरी मंथ निमित्ताने

# डेसीग्नेटेड मंथ- मेंबरशिप आणि न्यू क्लब डेव्हलपमेंट

पी.पी. रो. डॉ. राघवेंद्र काबरा



ऑगस्ट महिना हा मेंबरशिप आणि न्यू क्लब डेव्हलपमेंट या विषयाशी निगडीत आहे. त्या निमित्ताने आपले पी.पी.रो.राघवेन्द्र काबरा यांची रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी यांनी घेतलेली मुलाखत येथे सादर करीत आहोत.

प्रश्न :– आपण या वर्षी मेंबरशिप डेव्हलपमेंट आणि न्यू क्लब डेव्हपलमेंट या कमिटीचे चेअरमन आहात. काय आपल्या योजना आहेत या वर्षाच्या? आणि या विषयाचे काय महत्त्व आहे?

उत्तर :– जे नावाजलेले आणि उत्कृष्ट रोटरी क्लबज् आहेत ते सहज घडलेत असे होत नाही. त्यामागे त्यांचे नियोजन, विचारपूर्वक कृती आणि पूर्णत: समर्पित प्रयत्न अंतर्भूत असतात. ते आपल्या कार्याबद्दल सदैव माहिती व अभिप्राय (फिडबॅक) घेत असतात. जेणेकरून त्यांची प्रत्येक वेळी सुधारणा होईल. या क्लब मध्ये त्यांची मेंबरशिप सुद्धा सशक्त आणि दीर्घकाळ चालणारी असते. यासाठी जे आपले जुने सदस्य आहेत त्यांना इन्व्हॉल्व करून त्यांच्यावर मोठमोठ्या जबाबदाऱ्या देणे. तसेच नवीन मेंबर्सना सुद्धा रोटरीची संपूर्ण माहिती देणे व त्यांना सुद्धा प्रथमत: छोट्या छोट्या जबाबदाऱ्या देणे. जेणेकरून त्यांच्यात रोटरी बद्दल प्रेम आणि आत्मविश्वास निर्माण होईल. या सगळ्यांशी नेहमीच संपर्कात राहून त्यांची प्रतिक्रिया व त्यांना काय वाटते ते समजून घेऊन त्यावर योग्य ती कृती त्वरीत करणे असे काही उपाय आम्ही यावेळी करणार आहोत.

प्रश्न :– क्लबमध्ये अधिक सदस्य का असावेत?

उत्तर :– जितके तुमचे सदस्य जास्त तितके तुमचे प्रोजेक्टस् आणि इतर महत्त्वाच्या योजनांना तुम्हांला चांगले लोक उपलब्ध होतात. चांगले विविध विचार तुम्हांला अनुभवयाला मिळतात. ती एक प्रकारची तुमची ताकद (strength ) होते. आता या १ ऑगस्टच्या मिटींगला आपल्या अध्यक्षांनी Bring One Each One या प्रमाणे प्रत्येक सदस्याने एकेक नवीन व्यक्तीला क्लब मध्ये आणावे, जेणेकरून त्या व्यक्तीला रोटरीची माहिती होईल. आणि ती व्यक्ती नवीन सदस्य होण्यास तयार होईल.

प्रश्न :– नवीन क्लब सुरू करणेबद्दल काय सांगाल?

उत्तर :– आपण संधी मिळेल तेव्हा नवीन क्लब सुरू करायलाच पाहिजे. त्यामुळे रोटरीचा प्रसार होण्यास मदतच होईल. नवीन क्लब आपले सदस्य किंवा इतर व्यक्ती सुद्धा सुरू करू शकते. जेव्हा जुन्या रोटरी क्लब मध्ये बरेच सदस्य असतील, किंवा एखाद्या ठिकाणी पूर्वीपासूनच रोटरी क्लब नसेल अशा ठिकाणी नवीन क्लब सुरू होऊ शकतो. याचे मार्गदर्शन घेण्यासाठी आपल्या क्लबच्या किंवा रोटरी डिस्ट्रीक्टच्या नेतृत्वाला विचारणा करावी. नवीन क्लब सुरू करतांना त्या क्लब मध्ये सुरूवातीस कमीत कमी २० सदस्य असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे हे समजून घेणे ही गरजेचे आहे की नवीन क्लब सुरू करण्यासाठी व त्याचे संगोपन करण्यासाठी एखाद्या क्लबची तेवढी क्षमता आहे किंवा नाही.

## बालीवूड टाईम्स्

# न्यूटन.... द फिल्म...

रो.सुबोध सराफ



खूप वर्षापूर्वी दूरदर्शनवर 'मॅसी साहेब..' नावाचा सिनेमा पहिला होता... अतिशय प्रामाणिक पणे जगणारा मॅसी साहेब...याचे सुंदर चित्रीकरण बघायला मिळाले होते.... अगदी त्याचीच आठवण न्यूटन बघतांना आली....हिरो चे नाव विचारले जाते ....एका ईलेक्शन अधिकाऱ्या कडून ,,,,हिरो सांगतो न्यूटन .... अधिकारी चमकतो ....फिजिक्स मे रुची राखते हो ,,, कैसे रखा ? मा – बाप ने नूतन कुमार रखा था ... स्कुल मे ..दोस्त चिडाने लगे ...नूतन ....नूतन ...इसलिये मैने ...न्यूटन ...कर दिया... एक नूतन रुकि सरकारचा नवीन अधिकारी इलेक्शन ड्युटी साठी निवडला जातो ....तो एरिया नक्षली असतो ....खूप इंटिरियर मध्ये जावे लागते ....अतिशय दुर्गम भागात ...हे ठिकाण असते तिथे काहिच आढळत नाही ... तिथे पोहचतांनाच या टीम ची दमछाक होते ...मिलिटरी यांच्या बरोबर असते ..त्या शिवाय ते जाऊच शकत नसतात .... ओसाड आणि भकास आणि नक्षली प्रभावाखाली असलेल्या या एरिया मध्ये दहशत जागोजागी दिसत असते ...केव्हाही हल्ला होऊ शकतो ...अशी परिस्थिती ...बेचिराख झालेली वस्ती .... व्होटिंग होणार असते ती शाळेची अवस्था तर अशीच असते ...कसे तरी करून ते बूथ तयार करतात ...शंभू नावाचा मिलिटरी अधिकारी सांगण्याचा प्रयत्न करतो कि कोणीही नाही नक्षली च्या भीतीने न्यूटन मानायला तयार नसतो ...त्याला आपले काम प्रामाणिक पणे ..आणि सहेतूने करायचे असते ..सर्व विरोध पत्करून ..जीवाचा .धोका असूनही तो सर्वांना त्या जागे पर्यंत आणतो ...शंभू मात्र वेगळ्याच सेटिंग मध्ये असतो ..बनावट हल्ला झाला असे भासवून .....वोटिंग झाले असे जाहीर करतो सर्व बनावटरित्या घडवतो ...न्यूज चॅनल वालेही त्याचे रेकॉर्डिंग करतात ...न्यूटन अस्वस्थ होतो ....त्याला हे मान्य नसते ...तो हे सर्व कस बनावट आहे ..आणि खरे आदिवासी यांनी वोटिंग केलेहा नाही ...तो परत शाळे कडे ...त्या आदिवासींना नेतो जसे दिसतील तिथे वोटिंग करून घेतो ...आणि आपले काम प्रामाणिक पणे करतोच करतो ... अतिशय भेदक वास्तव चित्रण अमित मसुरेकर या मराठी दिग्दर्शकाने केले आहे पटकथा देखील त्याचीच आहे ..आणि न्यूटन पासून मैको झालेली अंजली पाटील ने ...शंभू च्या भमिकेत मुकेश प्रजापती आणि रघुवीर यादव ..आणि स्थानिक आदिवासी...या सर्वांनीच हा सिनेमा ..परिपूर्ण केला आहे तो आपल्या वास्तव अभिनयाने...असा ही सिनेमा असू शकतो ...आपण अवाक होतो... हा चित्रपट ऑस्कर साठी नसता निवडला गेला तरच आश्चर्य होते..आपल्याच देशातील हा भाग असू शकतो...हे मनाला कसे पटवावे? ...पण ठरवले तर प्रामाणिक पणे आणि सचोटीने जगता येते हा विश्वास हा सिनेमा देतो हे नक्की ...अतिशय भेदक आणि वास्तव चित्रण पाहिल्याचे समाधान हा सिनेमा आणि राजकुमार राव हा गुणी अभिनेता देतो.

---

## ७x७x७ प्रोजेक्टचे यशस्वी वक्ते























